# सेवक वार्ता

**कविता विशेषांक**

जुलै-२०२३

वर्ष -४, अंक-९

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६


## "कोकणातील शेतकरी "

वि.त्र्यं.पत्की

रोहीणी नक्षत्रात उष्णता व घामोळ्यांनी बेजार झालेल्या शेतकऱ्याचा जीवनक्रम व्यक्त करण्यासाठी ही रचना आहे. काही कोकणी शब्दांचा वापर केला आहे. त्या शब्दांचा अर्थ शेवटी दिला आहे.

### कविता

कवळं झाली छाटून,
भारे झाले बांधून,
राब झाला रचून,
सुकण्याची वाट करून ।।१।।
गोयले झाले तोडून,
शिर ओझ्याने वाहून,
गोठ्यात रचून,
वाट चुलीची पाहून ।।२।।
आगोटीची प्रतिक्षा करून,
परसाची मशागत उरकून,
बी-बियाणे शोधून,
पावशाची वाट पाहे थकून ।।३।।
राबाची राख पाहून,
मृगाच्या सरी आल्या धावून,
भात बी झालं रोवून,
सुरु झाले आनंदवन।।४।।
सरीवर सरी कोसळून,
बांध-बंदिस्ती करुन,
उपळणीस सज्ज होऊन,
लावणीची फौज घेऊन।।५।।
चिखलणी करून,
रोवणी करून,
चिंबोऱ्यांचा शोध करून,
श्रम-परिहार करीन।।६।।

-----------------------------------

*कवळं*- राबासाठी फांद्यांची छाटणी.
*भारे*- शिर ओझ्याने वाहण्यासाठी तयार केलेल्या मोळ्या.
*गोयले*- सरपणाच्या मोळ्या.
*आगोट*-पावसाळा
परस-घरा मागची मोकळी जागा.
*रोवणी*-भात रोपे लावणी
*उपळणी*-नांगरट
*चिखलणी*-भाताची रोपे लागवडीसाठी मशागत.
चिंबोरी-काळ्या पाठीचा मोठा खेकडा.

---

जुलै-२३ चा सेवक वार्ताचा अंक हा "सेवक सदस्य कविता विशेषांक

सेवक संघामध्ये अनेक कवी असल्याचे आढळून येत आहे. त्यांच्या प्रतिभेचा योग्य सन्मान होऊन त्यांना संघ मंचावर उचित स्थान व प्रसिद्धी देणे आता अगत्याचे ठरत असल्याने माहे जुलै-२३ चा सेवक वार्ताचा अंक हा "सेवक सदस्य कविता विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात येत आहे. विषय निसर्ग वाबींशी सबंधित आहेत

---

## आता रुजावं लागेल...

रामदास पुजारी,

आता रुजावं लागेल
मला या खडकावर..
खूप दिवसांपासून
तापतोय तो उन्हात...
पक्षी,वारा की प्रवाह
माहीत नाही कुणी..
आणून सोडलं माझं
बीज या खडकावर...
खडकांच्या खोबणीत
मिळालीयं थोडी जागा..
रुजण्यासाठी आहे ती
मला अगदी पुरेशी...
कडक उन्हात आता
तापतोय आम्ही सारे..
खडक,गवत नी मी
उभे आहोत नेटाने...
साठवलं माझ्यासाठी
त्यांनी थोडं अन्न पाणी
उभा त्यामुळे खंबीर
हिरवी माझी ही पाने...
उन्हाळा संपेल नी
श्रावणसरी येतील
तृणपाती फुलतील
रानं हिरवी होतील...
खडकावरील पाहू
वाहते प्रवाह आम्ही ..
पशु-पाखरं,माणसं
येतील आमच्या भेटी...
त्यांच्यासवे आम्ही सारे
आनंदाने नाचू गाऊ..
पुढच्या उन्हाळ्यासाठी
राशन थोडं साठवू...
दरवर्षी थोडा-थोडा
वाढेल,मोठा होईल..
खडकाला,साऱ्यांनाच
उन्हात छाया देईल...
रक्षावया वसुंधरे
लावा माणसांनो झाडं..
कमी पडतील बांध
पडीक जमीन,शेतं...
मला,माझ्या भावंडाना
जागा मिळेल तिथं..
आता रुजावं लागेल
सर्वांच्या रक्षणासाठी...

## लाजाळू

रामदास पुजारी,

अंगणी फुलली.
हिरवाईचा
शालू नेसलेली
नाजूक, सुंदर
ही लाजाळू ...
शाळेत शिकताना
नव्हती पाहिली कुठं
पण वाटायचे सदा
कुठे भेटेल
ही लाजाळू ?..
मग..
गाईगुरं राखताना,
बागेत फिरताना
ही दिसायची
चहूकडे अनेकदा...
स्पर्श होताच
लाजून चूर
व्हायची ही..
वाटायचे
किती लाजरी ही...
पण आज वाटतं
ते लाजणं नसावं..
आकुंचन पावून
दुसऱ्याला वाट करून
देणं असावं...
आपल्याबरोबरीन इतरांचंही
अस्तित्व, सहजीवन

मान्य करणं..
दुसऱ्यांप्रति आदर,विनम्रता
व्यक्त करणं असावं...
जमेल का ?
आम्हां सर्वांना..
तिच्यासारखं
आदर, विनम्रतेचं
पुजारी होणं...

## कितीतरी वर्षांनी..

**रामदास पुजारी**

कितीतरी वर्षांनी
तुला पाहिलं पुन्हा..
गाव शिवारातील
खडकांमधून,ओहोळ्ळांतून
हळुवार मार्गक्रमण करताना ...
दोस्ती तुझी माझी
तशी खूप जुनी .
माझ्या रम्य बालपणी
असायचो दिवसभर
तुझ्या संगतीत...
त्यावेळी तुला पाहिलंय
सदा गावच्या शिवारातील
रानावनांतील, डोंगरदऱ्यांतील
प्रवाहांतून मार्गक्रमण करीत
स्वच्छंद वाहताना...
रानावनातून चरणाऱ्यागाईगुरांची
आणि त्यांना राखणाऱ्या माझी
भागवलीयं सदा तू तहान..
अनुभवल्यात श्रावणसरी
अनेकदा तुझ्या सोबतीनं...
तुझं निर्मळ, निरागस असणं
खूप भावायचं तेव्हा,
आताही खूप भावतयं..
तेव्हापासून तुझ्याकडून
शिकतोय निर्मळपण,निरागसपण
सारखं वाटतं मला निर्झरा
प्रत्येकाने शिकावा तुझ्याकडून
निर्मळपणा, निरागसपणा..
वाहत राहावं नितळपणे
तुझ्यासारखंच आयुष्यभर
स्वच्छ, सुंदर विचार घेऊन...

## जीवनसाथी

**रामदास पुजारी**

तूच माझा जीवनसाथी
तूच माझा सखा सोबती...
हल्ली मला सारखा प्रश्न पडतो...
खरंच, माझ्या सर्वात जवळचं
कोण..?
ज्यांनी हे सुंदर जग दाखवलं,
आपले सारे लाड, हट्ट पुरविले
ते आई-वडील ..?
ज्यांनी आपल्याला
संस्काररूपी ज्ञानदृष्टी दिली,
ते गुरुजन..?
आपल्यावर जीवापाड प्रेम करणारी,
आपली सदैव काळजी वाहणारी
बायको व मुलं ?
की...
ज्यांनी आपलं जीवन
आनंददायी, सहजसुंदर बनवलं
ते बालपणापासूनचे सवंगडी,
आजवरचे सहकारी..?
पण यापैकी कुणीच नाही
माझ्या प्रश्नाचं उत्तर...
मनःशांती, आत्मानंदाच्या शोधात
भटकत होतो वणवण जेव्हा
मी आणि माझं मन !
सापडलास तेव्हा तू ..
माझा खरा जीवनसाथी...
भूत-भविष्याचा सोडून विचार
रहावं वाटतं सदा
तुझ्या संगतीत, तुझ्याच विचारांत..
"सावलीसारखं सदा सोबत... "
असं म्हटल्यावर,
आठवायचं एखाद्याचं त्याच्या
सावलीसोबत असणारं
घट्ट सोबतीचं नातं...
पण खरं सांगू..?
त्यापेक्षा कितीतरी अधिक जवळचं
आहे तुझं - माझं नातं...!
आईच्या गर्भात वाढत असताना
आईच पाठवायची तुला
माझ्याकडे...
तिथूनच सुरू झालं...
तुझं - माझं स्वतंत्र सहजीवन,
आदिपासून आहेस माझा सोबती
अंतापर्यंत असणार आहेस
माझा सोबती...
कारण तूच आहेस माझा
खरा जीवनसाथी
श्वास माझा तू ...
तुझं - माझं जसं
तसंच तुझं आणि ऑक्सिजनचंही
घट्ट अनोखं नातं..
एकमेकांच्या साथीनं आजवर जगलो
आपण आरोग्यसंपन्न जीवन ...
पण माझ्या प्रिय मित्रा,
तुझ्याकडे पाहून हल्ली
सारखं वाटतं मला,
" श्वासाचाही गुदमरतोयं
की काय श्वास...? "
व्हेंटिलेटर, ऑक्सिजन सिलिंडर
हे शब्द आजकाल
सतत ऐकल्यावर वाटतं...
श्वासाची आणि त्याच्या
प्रिय ऑक्सिजनची होतेयं का
आज ताटातूट ?
आजवर होता मुबलक
निसर्गात ऑक्सिजन आणि
होता सुरक्षित प्रत्येक श्वास...
माझ्या प्रिय श्वासा,
जमलं तर भेटेन म्हणतोय,
विचारीन म्हणतोय
त्या सर्वशक्तिमान विधात्याला...
" चुकलीत का रे तुझी लेकरं ?
कर ना त्यांना एकदा माफ...."
सांगेन त्याला..
"माहित झालंय तुझ्या लेकरांना,
प्रत्येक झाड म्हणजे
कारखाना ऑक्सिजन निर्मितीचा .."
लावतील सारी भरपूर झाडं
विहरेल पूर्वीसारखाच
ऑक्सिजन चहूकडे..
आणि...
प्रत्येक श्वास होईल
पूर्वीसारखाच समृध्द..
मी..
माझा श्वास..
आणि माझ्या श्वासामधला ऑक्सिजन..
खराखुरा प्राणवायू...
आमचं हे सहजीवन
असंच चालू राहील अखंड..
कारण माझा श्वासचं आहे
माझा खरा जीवनसाथी...!

## विठु वृक्ष

**डॉ. शेषराव पाटील**

उभा वृक्ष भुईवरी जणु विठ्ठल हिरवा
हात पसरुनी आकाशी देई धरेला गारवा
वृक्ष आहे विठुवानी लेकुरवाळे
पक्षिप्राणी व किटक हीच आहे त्याची बाळे
काही गात गोड गाणी
अंगा खांद्यावर खेळे
झेले उन व पाऊस जमिनीत घट्ट मुळे
वाऱ्यासह हाले डुले जणु पक्षांचे झोपाळे
वृक्ष दयाळु माऊली तोडणाऱ्यासही देई सावली
कुणी दगड मारता त्यालाही देई फळे फुले
वृक्ष दयाळु विठ्ठल असा कुठे हो भेटेल ?
विठु ची या करा पुजा
यासम हाच नाही दुजा

पुरवील तुमच्या गरजा
जिवनात येई मजा
विठुला या घाला पाणी
फळे फुले तोच आणी
जगवितो पक्षी प्राणी
असा विठ्ठल हा दानी

## रानफुले

डॉ. शेषराव पाटील

रानफुले ती कुठेही उगवती
नदिकाठी वा माळोरानी
जिथे मिळेल जागा थोडी
थोडी माती, थोडे पाणी
नाही कोठला थाट माठ त्या
उमलती दगडा खडकावर
पुर्ण होते आयुष्य त्यांचे
थोड्या माती अन पाण्यावर
फुलपाखरे वा मधमाशा
विसावती त्यावर जराशा
देऊन त्यांना मध मकरंद
रानफुलांना होई आनंद
नसेल नाव वा नसे सुगंध
हळूच उमलुन देई आनंद
नाही कोणती खंत त्यांना
हळुवार जातील मिटून
माणसानेही असे जगावे
सहज आणि आंनदाने
व्हावा आनंद सभोवताली
केवळ आपल्या अस्तीत्वाने

## हिरवी पाने

जी. एस. खांडेकर

ही हिरवी पाने
हसतात, बागडतात
इवल्याश्या देठावर
ती मुक्यानेच बोलतात .......॥धृ॥
तळपत्या उन्हातही
ती गारवा उधळतात
थंडीच्या लाटेत
ती ऊष्म्याची ऊब देतात
ही हिरवी पाने........
मुक्यानेच बोलतात ॥१॥
रात्र रात्र ती
दवबिंद्रुत भिजतात
सोनेरी किरणे लेऊन
ती पहाटेच उजळतात
ही हिरवी पाने........
मुक्यानेच बोलतात .....॥२॥
पावसाच्या पाण्याला
ती आसुसलेली असतात
अंगाखांद्यावर खेळवत त्यांना
अलगद जमीनीवर सोडतात
ही हिरवी पाने..........
मुक्यानेच बोलतात॥४॥
पिकल्यानंतर गळून ती
भुमातेच्या कुशीतच दडतात
विघटीत होऊन सुपीक मृदेच्या रुपात दिसतात
ही हिरवी पाने........
मुक्यानेच बोलतात ॥४॥
लागतात तेवढेच थेंब
पाण्याचे ते पितात
उरलेले नभात सोडतात
पाऊस होऊन, हेच तर बरसतात
ही हिरवी पाने......
मुक्यानेच बोलतात ॥५॥
अवास्तव विकासापोटी
ती कुस्करलीही जातात
नि विनाशाचे बिजांकुर
यातूनच अंकुरतात
ती पाहा हिरवी पाने.....
अशी आपसात कुजबूजतात ॥६॥

## वने आमुची

जी. एस. खांडेकर

वृक्ष लतांची गुंफण
फुला-फळांची बहरण
कोकीळेची कुहू कुहू
किड्या भुग्यांचे गुंजारण
अशी जनुकांची खाण
वने आमुची ।।१।।
साप सरड्यांची सळसळ
नी गरुडाची शिळ
वाघांची डरकाळी
माकडांच खेकसणं
अशी जनुकांची खाण
वने आमुची ।।२।।
वसा वैविध्याचा असा
लाभो अमुच्या वारसा
प्राण्यां सोबतीचे वन
सुख समृध्दीच देणं
राखु जनुकांची खाण
वने आमुची ।।३।।

## गा-हाणे

रामचंद्र मोरे,

समजू नको जना रे,साधे-सुधे गा-हाणे।
मी रोवले पक्षांच्या, चोचीतले हे दाणे।।
मानव निसर्गाला, समजून घेत नाही।
संपवून सगळी झाडे, नष्ट केले बियाणे।।
प्लॅस्टिक घनकचरा,धरा अंतरी विखारी।
सुख-समृधी अंती, मज काय देणे-घेणे!!
चारा मुखी पिलांच्या, घालू आता कुठे मी ?
अधिवास ना उरला, खिडकीत ते घराणे।।
घरच्यांना जागा नाही, पाहुण्यांची गर्दी झाली।
हाल बेहाल झाले,नित नव अतिरेकाने।।
जगवा अन् जगवूं द्या,हा मंत्र धरा मनी।
जगणे हा हक्क आमुचा,नको कोणते बहाणे।।

——१⁂*⁂१——

## ||•आजची घटीका•||..

( वर्षाऋतू कार्यक्रम)

रमेश माणिकराव सोनटक्के
सौ अलोलिका रमेश सोनटक्के

- सोनटक्के - . कुणी थांबतं थांबवता
दैनिक कर्तव्य कर्म ॥धृ॥
न्याहारी दुपारी सायकाळी
अन्न गृहन हे 'कर्म'.. ॥ १ ॥
आज समय पर्जन्यमान
करावे सेवन जांभळं.. ॥ २ ॥
निसर्गी अशोका नीम
आहेत विविध बीबियाणं .. ॥ ३ ॥
सर्व वृक्ष बीजच
करू विविध संकलन. ॥ ४ ॥
करू त्यावर सुयोग्य
संस्ककरण ॥ ५ ॥
पेरू बीज रुजण्यां
कुंडी पिशवी जमिनीत.. ॥ ६ ॥
उगवेल अतिछान
इवलं इवलं बालरोप ॥ ७ ॥
करू संगोपन संवर्धन
मनी दाटेल आनंद ॥ ८ ॥
करू असा यज्ञ
निसर्गस्वयंपूर्णसंपूर्ण. ॥ ९ ॥
कृतकृत्य होईल भू-माय
होऊ अबालवृद्ध सामील. ॥ १० ॥
करु वृक्षबीजरोपणी
सोहळा स्नेहपुर्ण.. ॥ ११ ॥
करू या हा यज्ञ संपूर्ण
वर्षाऋतू वातावरणी .. ॥ १२ ॥
माय वसुंधरा
नेसेल हीरवाशालू सदाबहार
वर्षभर बारा महिनं.

## कृतज्ञता

रमेश माणिकराव सोनटक्के
सौ अलोलिका रमेश सोनटक्के

आज समजा लगीनघाई
पेरू वेली-रोपं बि-बियाणी
'खाल' तूम्ही अन्न
काकडी कद्दू भोपळा सर्वच
इतर वेलवर्गीय अन्न
राहील मन प्रसन्न
होईल वसुंधरा माय
खुश सदाहरीत
आज गुरुवार कृतज्ञता
दिवस करू बि-बियाणं
हिरवं हिरवं घर
सर्व परिसर

~~~~~~~~~~~~~

## नमो भारतम् .

धन्य माझा भारत
आहे स्वयंपूर्ण सर्व क्षेत्रात.. धृ
अवकाश विज्ञान तंत्रज्ञान
संपन्नता आली सर्वत्रच .. १
आत्ता आहे महत्त्व
देणं आहे प्राधान्यच .. २
निसर्ग -पर्यावरण
करूया सुसंपन्न नियमित.. ३
छोटे मोठे आचरण
टाळू निसर्गाचा ताण .. ४
वृक्षबीजरोपण 'ग्रीन'
करू प्रयत्न स्वयंपूर्ण .. ५
घरोघरी पर्यावरणशिक्षण
काळानुरूप परिवर्तन.. ६
टाळू निसर्ग संहारक बाब
करू तीन-आर स्पष्ट..७
कमी करू वापर (१)
अती- कृत्रिम संसाधन (reduce)..८
पुनर्वापर वस्तूं (२)
कमी होई ताण पर्यावरण
(Reuse) .. ९
रिसायकल (३)
आज सावरू अतिशय भोगच
(Recycle) .. १०
निसर्गायन नमो नम:
संकल्प करू मनोमन.. ११

~~~~~~~~~~~~~

## श्री. तुषार चव्हाण यांना मिळाले एक दुर्मिळ यश आयर्नमॅन स्पर्धा पूर्ण केली

भावसे २०१३ बॅचचे श्री. तुषार चव्हाण भावसे अधिकारी यांनी २ जुलै २०२३ रोजी कझागिस्तान येथे १५.५६.१४ इतक्या वेळेत आयर्नमॅन स्पर्धा पूर्ण केली. निर्धारित कालावधी १७ तासांचा होता. त्यांना मिळालेले एक दुर्मिळ यश आणि हा सन्मान मिळवणारा देशातील पहिला भावसे अधिकारी. सध्या ते पुणे (वन्यजीव) येथे कार्यरत आहेत.
सेवकतर्फे गौरव कार्यक्रमाचे आयोजन करून आणि त्यांना बक्षीस देऊन त्याचे यश साजरे करणार आहे. कार्यकारी मंडळाने या कार्यक्रमासाठी रु.५०००/- खर्च करण्यास मान्यता दिली आहे.




## सामाजिक वनीकरण विभागातील रोपवाटिकांचे सेवक संघामार्फत मूल्यांकन

सामाजिक वनीकरण विभागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटिकांचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत रोपवाटिकांचे सेवक संघामार्फत मुल्यांकन करण्याचे क्षेत्रीय काम ३१ मे २३ रोजी पूर्ण करण्यात आले. सदयस्थितीत अहवाल तयार करणे चालू आहे.

## 🌻 सेवक संघ धुळे शाखा वार्षिक सर्व साधारण सभा

सेवक संघ धुळे शाखेच्या सन २०२२-२३ साठीची वार्षिक सर्व साधारण सभा खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे घेतली जाईल. कृपया उपस्थित राहावे असे सर्व सन्माननीय सदस्यांना कळविणेत येत आहे.

दिनांक: १३-८-२०२३ रोजी, रविवार
वेळ : सकाळी ११ वाजता
ठिकाण : धुळे

कार्यक्रम पत्रिका

| वेळ | कार्यक्रम |
|---|---|
| १०.००-१०४५ | :आगमन, नाव नोंदणी व चहापान |
| ११००-१३०० | :सभा कामकाज |
| १३००-१४०० | : भोजन |

सभेचा अजेंडा

(१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे
(२) धुळे शाखेने सन २०२२-२३ या वर्षात केलेल्या कामाचा आढावा घेणे .
(३) धुळे शाखेचे सन २०२२-२३ चा सेवक संघाचे सनदी लेखापाल यांचे अंकेक्षणास अधिन राहून सचिव सेवक संघ, धुळे शाखा, धुळे यांनी तयार केलेला / वार्षिक जमा-खर्च मांडणे
(४) धुळे शाखेचे सदस्य नोंदणीचा आढावा घेणे
(५) धुळे शाखेचे सन २०२२-२३ साठी वार्षिक कार्यक्रम, धोरण व अंदाज पत्रक ठरविणे
(६) उत्कृष्ठ कामाबद्दल वन कर्मचारी व सेवक सदस्य यांचा सत्कार
(७) आयत्या वेळचे विषय

## नवीन सदस्य

श्री. रामदास पुजारी, सेवानिवृत्त सवसं पुणे हे २६ जून २०२३ पासून आजीवन सदस्य झालेत.

श्री. विठ्ठल पोपट पवार, सेवानिवृत्त वनक्षेत्रपाल धुळे हे ४ जुलै २०२३ पासून आजीवन सदस्य झालेत.

या सर्व सदस्यांचे वतीने हार्दिक स्वागत. त्यांचे सर्व सदस्यांचे वतीने हार्दिक स्वागत.

## निवृत्त वनपाल श्री चंद्रभानजी उंदीरवाडे यांच्या पुत्राची भारतीय प्रशासकीय सेवेत निवडीबददल सत्कार

श्री. चंद्रभानजी उंदीरवाडे सेवानिवृत्त वनपाल यांचे सुपुत्र श्री अमित यांनी संघ लोकसेवा आयोगाच्या 2022 च्या परीक्षेत 581 वे स्थान प्राप्त केले. ही वन विभागास गौरव देणारी घटना आहे. श्री अमित यांचा सेवक संघातर्फे सत्कार आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आलेले होते. त्यानुसार श्री अमित यांचा सत्कार दिनांक १ जुलै २०२२ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत साकोली येथील मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित केला होता. नागपूर वनवृत्त व अमरावती वनवृत्त शाखेचे सदस्य या सत्कार समारंभास हजर होते. त्यासाठी रू. १०,०००/- खर्च करण्यास सेवक कार्यकारणीने मंजूरी प्रदान केली होता. यासाठी श्री. खुणे सदस्य यांनी पुढाकार घेतला होता.

श्री अमित यांना कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी यांचे हस्ते शाल व सन्मानचित्र प्रदान करण्यात आले तसेच श्री व सौ उंदीरवाडे यांचा सुद्धा सन्मानपत्र व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

श्री अमित यांनी त्यांचे मनोगत



मनोगत व्यक्त करताना सांगितले की स्पर्धा परीक्षा करिता वेगवेगळ्या विषयांचा खूप अभ्यास करण्यापेक्षा एक निश्चित दिशा ठरवून अभ्यास करणे त्यांना योग्य वाटले व त्याप्रमाणे त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी केली . तसेच Interview करिता जातांना व देताना सुद्धा प्रसंगावधान ठेवणे फार आवश्यक असते हे त्यांनी आवर्जून सांगितले.

### श्री चंद्रभानजी उंदीरवाडे यांच्या बद्दल थोडक्यात माहिती

श्री. चंद्रभानजी उंदीरवाडे यांचे वन विभागातील कार्य राजोली सारख्या दुर्गम परिक्षेत्रातून ( जे क्षेत्र नंतर नक्षलग्रस्त क्षेत्र म्हणून ओळखण्यात येऊ लागले ) सुरू झाले. त्या क्षेत्रात त्यांनी १९८६ ते १९९४ पर्यंत काम केले. त्यानंतरच्या काळात वनरक्षक म्हणून कार्यरत असतांना ते इंग्रजी व मराठी शॉर्टहॅन्ड व टायपिंग शिकले. याचा पुरेपूर उपयोग त्यांनी, ते २००३ मध्ये शहापूर येथे वनरक्षक प्रशिक्षणासाठी असताना करून घेतला. त्यांचे इन्सट्रक्टर जे शिकवायचे ते मराठी शॉर्टहँड मध्ये ते वहीत उतरवायचे व नंतर रूमवर येऊन मराठीत लिहून काढायचे. वनरक्षक प्रशिक्षण ते ऑनर्स मध्ये उत्तीर्ण झाले. पुढे त्यांनी स्वतःला संगणक प्रशिक्षित सुद्धा केले. एकंदरीत मेहनत घेऊन शिकण्याची प्रवृत्ती उंदीरवाडे कुटुंबात उपजतच असल्याची दिसून येते.

वडीलांचे गंभीर आजाराच्या परीस्थीतीत सुद्दा श्री. अशोक खुने यांनी सेवक संघाचा उपक्रम योग्य रीतीने पार पाडला.












### श्री चंद्रभानजी उंदीरवाडे व सौ. वैशाली उंदीरवाडे यांना दिलेले सन्मानपत्र व त्यावरील मजकूर

*॥ सन्मानपत्र ॥*

*वनांच्या परिसरातील ग्रामीण भागात मुख्यालय स्थित क्षेत्रीय वन कर्मचा-यांचे पाल्य शहरी भागातील उच्च दर्जाची शैक्षणिक साधने, अद्यावत शिकवणी वर्ग, वाचनालये, अभ्यासिका, दर्जेदार शिक्षक यापासून कायम वंचित असतात. अशा वेळी आमच्या क्षेत्रीय वनकर्मचा-याचा पाल्य देशातील सर्वोच्च दर्जाच्या केंद्रीय लोकसेवा आयोग स्पर्धापरीक्षेत निवडीस पात्र होवून देशातून ५८१ वा क्रमांक प्राप्त करतो तेव्हा आम्हा प्रत्येक वानिकाचा उर अभिमानाने भरून आल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच वनपाल श्री चंद्रभान उंदीरवाडे आणि सौ. वैशाली उंदीरवाडे या दाम्पत्त्याने त्यांचे चिरंजीव श्री. अमित यांच्या या स्वप्रपूर्तरूप दैदीप्यमान यशाकरीता घेतलेल्या अपार कष्टांची समस्त वनविभागाने नोंद घेत या प्रयत्नांना भरभरून दाद देणे गरजेचे आहे. करिता आम्ही सेवक द्वारा श्री चंद्रभान व सौ. वैशाली उंदीरवाडे या दंपत्तीस हे सन्मानपत्र प्रदान करीत आहोत.*

*शुभेच्छुक*
*सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ महाराष्ट्र, पुणे*
*१ जुलै २०२३*

### श्री पत्की साहेबांचा बहुमूल्य संदेश, दि.१-७-२०२३

प्रिय चि.अमित यास शुभाशिर्वाद,

केंद्रीय लोकसेवा आयोगाचे स्पर्धात्मक परिक्षेत लक्षणीय यश मिळवून, आपले, आपल्या आई-वडिलांचे आणि वन विभागातील क्षेत्रिय कर्मचाऱ्यांचे नांव उंचावल्याबद्दल, मी तुझे मन:पूर्वक अभिनंदन करतो. यापूर्वी ऐवढे घवघवीत यश निम्नस्तरीय वन कर्मचाऱ्यांचे पाल्याने

प्राप्त केल्याचे मला आठवत नाही.या यशात तुझे आई-वडिल आणि गुरूजन यांचा सिंहाचा वाटा आहे आणि तुझे प्रयत्न व परिश्रम यांचा वाटा त्यानंतरचा आहे हे सदैव स्मरणात ठेवावे.

पद हे सेवेचे माध्यम असून, ईश्वराने तुझी निवड त्यासाठी केली आहे. हा ईश्वरी प्रसाद तळा-गाळातील गरीबांपर्यंत पोहचविणे हे प्रथम कर्तव्य असून, त्यांचे आशिर्वाद मिळविणे हीच खरी कमाई आहे, आणि ती कमाई तूझे पदरी भरभरून पडो ही प्रार्थना करतो.

सेवा कुठलीही असो,भा.प्र.से./ भा.पो.से. / भा.रे.से./ भा.म.से./ भा.आयकर सेवा,ती नेकीने व इमानदारीने केल्यास ईश्वर सदैव पाठराखण करतो.

मोठा सत्कार आम्ही करू शकलो नाही परंतु आमच्या भावना मात्र नक्कीच मोठ्या आहेत, हे आवर्जून सांगतो.

भावी आयुष्य व सेवा सुखकर व आनंदाचे जावो ही शुभेच्छा व्यक्त करून, संदेश थांबवितो.

जयहिंद ।

विठ्ठल त्र्यंबक पत्की.

से. नि. वन संरक्षक, पुणे. ९८२२६ ७८६४९


## निधन वार्ता

* श्री.बी.एम.कामे सेवानिवृत्त वन अधिकारी यांचे दि.२५ जून २३रोजी पुणे येथे वार्धक्याने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी वैकुंठ स्मशानभूमीत झाला. ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो.

श्री खुणे, सेवक संघ सदस्य यांच्या वडिलांचे निधन झाले आहे. वय ९१ वर्षे. गेल्या काही दिवसांपासून त्यांची तब्येत जास्त खालावली होती. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

सेवक संघातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## श्री रामदास पुजारी यांच्या कविता संग्रहाची दुसरी आवृत्ती प्रकाशित




श्री. रामदास पुजारी सेवानिवृत्त सहाय्यक वन संरक्षक सध्या पुणे येथे त्यांच्या "आई माझं जग" या कवितासंग्रहाचं दुसरी आवृत्ती ५ सप्टेंबर रोजी प्रकाशित झाली. या पुस्तकाची पहिली आवृत्ती जुलै २०२० मध्ये प्रकाशित करण्यात आली होती व त्यानंतर एवढ्या अल्प कालावधी दुसरी आवृत्ती प्रकाशित होणे ही या कवितासंग्रहाचे स्वागत वाचकांकडून करण्यात आले याची पावती आहे. या काव्यसंग्रहात त्यांच्या कविमनातील विविध भावरंगाची सुंदर अभिव्यक्ती असून आई-वडील कवितांसोबत कविच्या आईची तसेच आईची आई- सर्वांची आई असणाऱ्या माता वसुंधरेची काळजी घेण्याइतकच महत्त्वाचा भाव आहे म्हणूनच "आई माझं जग " हे संग्रहाचे नाव अतिशय व्यापक व समर्पक आहे, अशा शब्दात पद्मभूषण डॉक्टर विजय भाटकर, शास्त्रज्ञ व संगणक तज्ञ तथा कुलगुरू, नालंदा विद्यापीठ यांनी या कवितासंग्रहावर आपले अभिप्राय दिले आहे. या कवितासंग्रहास अनेक मान्यवरांचे आशीर्वाद लाभले आहेत. त्यात प्राध्यापक डॉक्टर दत्तात्रय डुंबरे, प्रमुख, मराठी भाषा संशोधन केंद्र, औरंगाबाद, डॉक्टर संगीता बर्वे , ज्येष्ठ साहित्यिका, साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या व अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था यांच्या प्रस्तावना मिळाल्या असून श्री अण्णा हजारे यांनी शुभ संदेश दिले आहेत. तसेच डॉक्टर सर्जेराव निमसे, माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी कौतुकाचे दोन शब्द या स्वरूपात आपल्या भावना व्यक्त आशिर्वाद दिले आहेत. कवींनी आपल्या प्रस्तावनेत त्यांना या कवितासंग्रहाच्या प्रकाशन कामी प्रोत्साहन दिलेल्या अनेकांचे ऋण व्यक्त केले.

श्री रामदास पुजारी यांच्या कवितेतील एक कडवे वानगी दाखल देत आहे. यातून त्यांच्या आई बद्दलची प्रेम भावना अतिशय उत्कटपणे व्यक्त होताना दिसतात

उन्हाळा संपेल
पावसाळा सुरू होईल
मृगाच्या सरी कोसळतील
मृदगंध सर्वत्र असेल
वातावरण कसं फिरून येईल
पण मन माझं असेल
तू नसल्याने
माझ्या मनात भावनांचे वादळ उठेल

सदर कवितासंग्रहाचे स्वागत मूल्य दीडशे रुपये मात्र असून त्याचे प्रकाशक आहेत : वेदांतश्री प्रकाशन, १६७५/१, कृष्णलीला चेंबर्स, सदाशिव पेठ, टिळक रोड, एस. पी. कॉलेज समोर, पुणे-30

श्री. पुजारी हे अनेक सामाजिक शैक्षणिक बाबतीत व्यस्त असते असले तरी त्यांनी नुकतेच सेवानिवृत्त वन कर्मचारी संघाचे सदस्य स्वीकारून संघाच्या कार्यात सहभाग दर्शविण्याची तयारी केली आहे





सामाजिक वनीकरण विभागाचा प्रसिद्धी अधिकारी म्हणून काम करताना १९९७ दरम्यान छपाई करण्यात आलेल्या स्टिकरसाठीचे माझे शब्द...

नातं जोडू वनीकरणाशी
जल आणि मृदसंधारणाशी

विश्रांतवाडी चौकातून विमानतळाकडे जाताना दिसणारे माझे घोषवाक्य. योगायोगाने, आळंदीहून येताना विश्रांतवाडी चौकागोदर मनपाने खूप पूर्वी लावलेल्या माझ्या स्लोगनचा फोटो घेतला होता... तो खास तुमच्यासाठी.

***************************


प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१ दूरध्वनी ०२०-२६१२३३१६ / २६१२२७०२

महाराष्ट्र शासन - वन विभाग

वन विभागाशी संबंधीत महत्वपूर्ण बाबींकरिता आशय लेखन करण्याकरिता अर्ज सादर करणेबाबत

वन, वन्यजीव व सामाजिक वनीकरण विभाग यांची विविध माध्यमांद्वारे (जसे की मुद्रण साहित्य, दृकश्राव्य माध्यमे आणि बाह्य माध्यमे इत्यादी) प्रसिद्धी व विस्ताराची कामे प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयामार्फत वर्षभर करण्यात येतात.

वन विभागाशी संबंधित विविध बाबी उदा. विभागातील योजना, वन्यजीव, सामाजिक वनीकरण, कृषी वानिकी, नैसर्गिक घटकांचे संरक्षण आणि संवर्धन इत्यादींविषयी प्रचार व प्रसिद्धीच्या दृष्टीकोनातून लेख, माहितीपट इ. आकर्षित व सुबोध पद्धतीने पण विषयाची महत्वपूर्ण बाबींविषयी माहिती जपत आशय लेखन करण्यासाठी अनुभवी तसेच वन विभागाशी दीर्घ काळ संबंधित असलेले सेवानिवृत्त शासकीय अधिकारी, सेवानिवृत्तीच्यावेळी किमान सहाय्यक वनसंरक्षक पदावर कार्यरत असणारे वनाधिकारी, वन्यजीव व वनस्पतींविषयी रुची असणारे अभ्यासक, सामान्य नागरिक व पर्यावरण संरक्षणाच्या क्षेत्रात सक्रिय असलेल्या अशासकीय संस्था यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

वरील प्रयोजनासाठी मासिक आधारावर व्यक्तींच्या सेवा घेण्यात येतील. तरी अर्जदारांनी यापूर्वी केलेल्या कामांच्या अनुभवासंबंधीचे आवश्यक दस्तऐवज जसे व्यक्ती / संस्था यांचा परिचय, पूर्वी केलेल्या कामांचा थोडक्यात तपशिल, यासंबंधी विशेष पुरस्कार / प्रमाणपत्र प्राप्त असल्यास त्याचा तपशिल तसेच अपेक्षित प्रति माह मानधन इत्यादी माहिती दि. 31 जुलै पर्यंत अथवा त्यापूर्वी खाली दिलेल्या पत्त्यावर सादर करावी.

प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
मध्यवर्ती इमारत, पुणे- ४११००१
email: pccfsfm@gmail.com
दूरध्वनी क्रमांक (०२०) २६१२६३२४

स्वाक्षरी-
प्रधान मुख्य वनसंरक्षक,
सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

डीजीआयपीआर २०२३-२०२४/२१२८

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी